नोंदणी क्र. इ. १२६३ (पुणे)

## ग्रामीण महिला व बालक विकास मंडळ

(बँक ऑफ महाराष्ट्र पुरस्कृत)
द्वारा : बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रामीण विकास केंद्र
जनमंगल, हडपसर औद्योगिक वसाहत, पुणे ४११०१३.
फोन : ०२० - २६८७०८१५, २६८१४८४६
Email: rdchadapsar@gmail.com

# असीमित उर्जेस मदत

### ग्रामीण महिला व भावी ग्रामीण पिढीच्या विकासाचा एक शोध

भारतात स्त्री ही माता, भगिनी व पत्नी या तिच्या भूमिकांत पूज्य आहे. ती कुटुंबास एकत्र ठेवणारी केंद्र शक्ती असून मोठयांच्या व मुलांच्या गरजांकडे समानतेने पाहणारी आहे.

परंतु पुरूष साथीदाराप्रमाणे शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या संधी ज्यांना उपलब्ध आहेत अशा शहरातील स्त्रिया व ग्रामीण व शहरी क्षेत्रातील गरीब , दुर्बल वर्गातील स्त्रिया, यांच्यात खूप विषमता आहे.

वर्ष १९८९ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र आणि राष्ट्रीय बैंकग प्रबंधन संस्थान (एन आय बी एम) च्या स्वप्न द्रष्टांनी एकत्र येऊन, गरीबात गरीब ,औपचारिक शिक्षण न घेतलेल्या परंतु कुटुंब व पशुधन सांभाळण्याची, सण साजरे करण्याची, विविध पाककृती आणि ऋतुमानाप्रमाणे लोणची, पापड करण्याची प्रचंड क्षमता असलेल्या, परंतु शेतमजूर म्हणून काम करणा-या ग्रामीण महिलांना मदत करण्याचे ठरविले.

ग्रामीण क्षेत्रातील महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याचा स्तर सुधारण्यासाठी जून १९८९ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने ग्रामीण महिला व बालक विकास मंडळ नावाचा ट्रस्ट स्थापन केला. ट्रस्ट जीएमबीव्हीएम (GMBVM) या नावाने ओळखला जातो.ट्रस्टने महिलांचा सर्वांगीण व व्यापक विकास व त्यांचे सशक्तीकरण करण्याचे लक्ष्य समोर ठेवले.स्वसहायता गटाच्या माध्यमातून त्यांना संघटित केले व अर्थार्जनाची कामे हाती घेण्यास त्यांना मदत करण्याचे ठरविले.

**ग्रामीण महिला व बालक विकास मंडळाव्दारे खालील उपक्रम नि:शुल्क राबविले जातात**

१) महिलांना स्वयंसहायता गट बनविण्यास मदत करणे.

२) महिलांना उत्पन्न वाढीच्या हेतुने विविध व्यवसायाचे अपरंपरागत शिक्षण देणे.

३) महिलांनी निवडलेला व्यवसाय चालविण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे.

४) ग्रामीण महिलांना अर्थार्जनाचे विविध मार्गाचे परिचय होण्यासाठी कौशल्य व तंत्रज्ञान उपलब्ध होईल अशा सुविधा निर्माण करणे.

५) ग्रामीण महिला व महिला बचत गटांना अर्थार्जन करण्याच्या दृष्टीने हाती घ्यावयाच्या व्यवसायाकरिता वित्त सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी मदत करणे.

६) महिलांनी निवड्लेल्या व्यवसायामुळे उत्पादित होणा-या वस्तूसाठी आवश्यक ती विपणन व्यवसाय उपलब्ध करून देऊन प्रोत्साहन देणे.

७) आर्थिक उन्नतीच्या हेतूने महिला बचत गटांना विविध व्यवसाय निवडून असे व्यवसाय चालविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन व मदत करणे.

८) ग्रामीण भागातील महिला व त्यांच्या मुलांच्या (विशेषत: आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांपैकी अर्थिक, आरोग्यविषयक शैक्षणिक ,सामाजिक सांस्कृतिक विकासासाठी सहकारी तत्वांवर सामाईक /गट पध्दतीने विविध योजना आखणे व राबविणे.

**ग्रामीण महिला व बालक विकास मंडळची महत्त्वाची कार्यक्षेत्रे**

१) रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ, बिगर सरकारी संघटना (एन जी ओ)आणि डॉक्टर यांच्या सहकार्याने स्वसहायता गटाच्या सदास्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे.गटाच्या सदस्यांसाठी ट्रस्टने खालील गोष्टी केल्या आहेत- त्यांचे रक्तगट तपासणे, आरोग्य आणि डोळे तपासणी शिबीर आयोजित करणे, शौचालय बांधणे इ.

२) स्वसहायता गटाच्या कार्याबददल प्रशिक्षण -अर्थात स्वसहायता गटाचे हिशोब ठेवणे, चांगल्या स्वसहायता गटाच्या कार्यासाठी नियम व पध्दती, सदस्यांची जबाबदारी, बँकेशी वित्त /ऋण -संलग्नतेसाठी स्वसहायता गटाची आवश्यक श्रेणी प्राप्त करणे याबाबत प्रशिक्षण दिले जाते.

३) स्वसहायता गटाचा स्तर उंचावून त्यांना लघू व सूक्ष्म उद्यमी बनविणे - स्वसहायता गटांच्या सदस्यांना जीएमबीव्हीएमव्दारे पणन सेवा देण्याचा एक भाग म्हणून जीएमबीव्हीएम पुण्यात मार्केट यार्ड येथे ''सावित्री'', स्वसहायता समुहांच्या उत्पादनाचे - विक्री केंद्र (मोबा. नं. ७५८८४५१८७५) चालविते.स्वसहायता गटाचे सदस्य, महिला उद्यमी आणि ग्रामीण शिल्पकार आपले उत्पादन केंद्रात देऊ शकतात.

४) बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठी विविध ठिकाणी प्रदर्शने भरविले जातात.

५) ग्रामीण भागातील अल्प उत्पन्न गटांतील महिलांना त्यांच्या गावातच त्यांच्या आवडीच्या व्यवसायात मोफत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण संस्था सतत देत आहे व त्यातून ग्रामीण महिलांचे अर्थिक सबलीकरण करून महिलांची आत्मनिर्भरता व त्यांचे आर्थीक उत्थान करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते.

**संस्थेमार्फत मोफत देण्यात येणारी विविध कौशल्यविकास प्रशिक्षणे खालील प्रमाणे:**

१) कागदी पिशवी तयार करणे
२) विविध प्रकारचे दागिने (Jewellery) बनविणे
३) सुगंधी अगरबत्ती ,धूप तयार करणे
४) हॅन्डवॉश, निळ, फिनेल तयार करणे
५) कापडी पिशवी तयार करणे
६) मेणबत्ती, शोभेचे दिवे आणि विविध प्रकारचे तोरण तयार करणे
७) विविध प्रकारचे मसाले व पापड बनविणे
८) उद्योजकता विकास प्रशिक्षण देणे
९) ग्रामीण भागातील शेतकरी महिलांना रेशीम उद्योग उभारणीसाठी प्रशिक्षण देणे
१०) राखी बनविणे व वारली पेंटींग
११) बेकरी पदार्थ व केक तयार करणे.

**ग्रामीण महिला व बालक विकास मंडळाने नोव्हेंबर २०२१ पर्यंत केलेल्या कामाचा आढावा**

| स्थापन केलेले गट | कर्ज वाटप झालेले गट | एकूण कर्ज वाटप रक्कम |
|---|---|---|
| ३३१३१ | ३१५२४ | १३,४४३.६८ लाख |